# निश्चलनीकरणाचं 'सत्याभासी' राजकारण

*नकारात्मक तथ्ये दूर सारल्याने सत्याची सत्ता क्षीण होईल का?*

कालप्राप्त असेल तेव्हा राजकारणी व्यक्ती असत्याचे इमले उभारतात, आकडेवारी दाबू पाहतात आणि उघडपणे तथ्यांचं विकृतीकरणही करतात. आपण दिलेल्या आश्वासनांवर पांघरुण घालण्याच्या राजकीय निकडीनुसार त्यांच्या 'कालप्राप्त'तेची सुरुवात निश्चित होते. विशेषतः 'नशीब निर्धारित' करणाऱ्या निवडणुका जवळ आल्या की या खटपटींना आरंभ होतो. गेल्या काही वर्षांमधील भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) सरकारचा आपल्याला आलेला अनुभवही असाच आहे. नरेंद्र मोदींनी २०१४ साली मतदारांना अनेक आश्वासनं दिली, पण सत्तेवर आल्यानंतर त्यांना ती पूर्ण करता आली नाही किंवा त्याची त्यांनी फिकीरही केली नाही; याचाच परिणाम म्हणून त्यांचं सरकार आर्थिक व सामाजिक धोरणांविषयी सवयीने धडधडीत असत्यकथन करत राहिलं आहे. पण त्यांच्या या फसवणुकीचं समर्थन करणारेही लोक आहेत. विद्यमान सरकारच्या व्यवहारातील विसंगती म्हणजे 'अवाजवी सत्य'च ('असत्य' नव्हे) असल्याचा या समर्थकांचा दावा आहे. भारताला (पुरातन आर्थिक अपराधांपासून) 'मुक्त' करण्यासाठी काही बदल आवश्यक आहेत, त्याचंच रणशिंग या सरकारने फुंकलं आहे, आणि 'केवळ हेच' सरकार अशी धोरणं राबवायचा विचार करू शकतं, अशी मांडणी समर्थकांकडून केली जाते. अशा फर्ड्या वक्तृत्वशास्त्रींचं पाठबळ असलं तरीही, भाजपने केलेली ताजी आर्थिक फसवणूक कोणत्याच अस्सल आर्थिक तर्काद्वारे समर्थन करता येण्यासारखी नाही. सरकारने केलेली निश्चलनीकरणाची स्वघोषित 'नैतिक कृती' ही या फसवणुकीमध्ये सर्वाधिक मोठी वाटेकरी आहे.

विरोधी पुराव्यांना फेटाळून लावणं किंवा त्यांचं विकृतीकरण करणं, एवढंच नव्हे तर दडपशाही व अहंकारी तुच्छता दाखवत भाजप सरकारने स्वतःच्या असत्यकथनाला वैधता देण्यासाठी वस्तुस्थितीचा विपर्यास केला, ही अधिक चिंतेची बाब आहे. निश्चलनीकरणाचे शेती क्षेत्रावर (विपरित) परिणाम झाले, असा निष्कर्ष काढणारा एक अहवाल अलीकडेच केंद्रीय कृषी मंत्रालयाने मागे घेतला, त्याऐवजी दुसरा अहवाल सादर केला आणि शिष्टाचाराचा भंग केल्याच्या आरोपावरून संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवली. ही केवळ बळजबरी नाही, तर 'हे खोटं आहे, पण काय फरक पडतो' असा पवित्रा घेणारी बेपर्वाईची वृत्ती यातून दिसते. मुळात फरक कोणाला पडतो, हा कळीचा प्रश्न आहे. सरकारने आपल्या उत्तरदायित्वाची जबाबदारी पार पाडणं अपेक्षित असतं. मतदारवर्ग आणि विरोधकांनी सरकारला उत्तरदायी ठेवण्याची- किमान 'स्पष्टीकरण' देण्याइतकं तरी उत्तरदायित्व सरकारने दाखवावं (म्हणजे गैरशासनाबाबत उत्तरं द्यावीत), यासाठीची जबाबदारी पार पाडायची असते. परंतु, 'असत्यांची अदलाबदल' करून पूर्वग्रह, भावना आणि क्षोभ यांवर आधारित स्फोटक वक्तृत्वांमुळे (समाजमाध्यमांचा निवडीतील पक्षपातीपणा व विपरित भावनांचा प्रचार करण्यातील जलदता यांचाही मोठा हातभार या प्रक्रियेला लागला) भारतीय लोकशाहीतील संवादाची अवकाश आकुंचित होते आहे, त्यापुढे जाऊन

संभाषित उभं राहाण्याची शक्यता तर दूरच.

त्यामुळे, विद्यमान राजकीय संभाषितामध्ये निश्चलनीकरणाच्या बौद्धिक आशयाची पूर्ण वानवा आहे. या वर्षभरात देशभरामध्ये शेतकऱ्यांची निदर्शनं झाली/मोर्चे निघाले, विशेषतः ३० नोव्हेंबर २०१८ रोजी दिल्लीत मोठा शेतकरी मोर्चा निघाला- या घडामोडींद्वारे विरोधकांनी हमीभाव, कर्जबाजारी, कर्जमाफी, इत्यादींसारख्या (ग्रामीण) लोकभावनांना खतपाणी घालण्यात यश मिळवलं, परंतु निश्चलनीकरणामुळे झालेल्या अपरिवर्तनीय आर्थिक हानीचा या घटकांवर झालेला परिणाम अधोरेखित करण्याचं त्यांच्या लक्षातही आलं नाही. उदाहरणार्थ, किमान हमीभाव वाढवण्याच्या मागणीला सक्षम खरेदीचं पाठबळ नसेल, तर या भावाचा शेतकऱ्यांना काही लाभ होत नाही. त्याऐवजी 'रोखीच्या चणचणी'मुळे ग्रामीण रोजगारावर आणि उत्पन्नावर झालेल्या विपरीत परिणामांच्या विरोधात सक्षम खरेदीची व्यूहरचना आखण्याबाबत मतदारांमध्ये एकमत निर्माण करण्याची गरज होती.

भाजपने भारतातील राजकीय अवकाशामध्ये आणलेल्या 'सत्त्योत्तर' राजकारणामुळे समर्थक व विरोधकही सोयीस्कर तेवढी माहिती उचलून त्यावर आधारित प्रतिक्रिया देण्यात मग्न होतात. उदाहरणार्थ, भाजपचे खासदार वरूण गांधी यांनी 'द हिंदू'मध्ये ३ डिसेंबर २०१८ रोजी 'जॉब क्रिएशन अॅट फार्मर्स डोअरस्टेप' अशा शीर्षकाचा लेख लिहिला, आणि काँग्रेस पक्षाध्यक्ष राहुल गांधींनी १० ऑक्टोबर २०१८ रोजी राजस्थानातील ढोलपूर इथल्या प्रचारमोहिमेत रोजगारनिर्मितीची मोठमोठी आश्वासनं दिली- या दोन्हींमध्ये मतपेढी आपल्या बाजूला खेचण्याचे तात्पुरते राजकीय हितसंबंध तेवढे दिसतात. यातील कोणत्याही वक्तृत्वांमधून मूलभूत प्रश्नांविषयीची स्पष्टता येत नाही. ग्रामीण बिगरशेती रोजगाराचा मुख्य आधार असलेलं अनौपचारिक क्षेत्र निश्चलनीकरणाच्या आणि वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी; गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स) धक्क्याने गांगरून गेलेलं असताना बिगरशेती रोजगारामध्ये वैविध्य कसं आणता येईल? शिवाय, असंघटित उत्पादन, बांधकाम, व्यापार व वाहतूक क्षेत्रांमध्ये सर्वांगीण ऱ्हास होत असताना नवीन रोजगारनिर्मितीचं आश्वासन प्रत्यक्षात कसं येणार?

विद्यमान सरकारच्या असत्यकथनांना आव्हान देताना निदर्शक वा विरोधक सौम्य विषयांना हाताशी घेत आहेत, शिवाय आर्थिक निर्णयबुद्धीला नाकारणाऱ्या 'नैतिकते'ची सारखीच भाषा बोलत आहेत, हेसुद्धा अस्वस्थ करणारं आहे. या प्रक्रियेत अनेक गंभीर प्रश्न नजरेआड होतात किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं जातं. वास्तविक नेत्यांची/सरकारची निवड करताना मतदारांनी 'जागरूक' निवड करावी, यासाठी हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. अशा प्रकारे प्रश्न नजरेआड करणं सरकारच्या वस्तुस्थिती विपर्यासाच्या अथक प्रयत्नांना पूरक ठरणारंच आहे. निश्चलनीकरणामुळे झालेल्या रचनात्मक बदलांच्या संदर्भात शेतीप्रश्नाचं विश्लेषण करण्याचा एकाग्र प्रयत्न विरोधकांनी वा निदर्शकांनी केला नाही, त्यामुळे भाजप सरकारचा अवाजवी अहवालच विश्वासार्ह भासण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे आणि त्यातून निवडणुकीतील निवडीवरही प्रभाव पडू शकतो. परंतु, भाजपच्या असत्यांमुळे 'उलट्या' दिशेनेही नैतिक क्षोभ निर्माण झाला आहे, हे समाधानकारक आहे. नागरी समाजातील काही घटकांनी 'बदला'च्या दाव्यांची छाननी सुरू ठेवली आहे. भाजपने बदलासाठी केलेल्या 'नैतिक' आवाहनामध्ये अनुस्यूत असलेल्या पक्षपाती राजकारणातूनच निश्चलनीकरणासारखा संतापजनक निर्णय घेण्यात आल्याचं या घटकांचं मत आहे. सत्त्योत्तर राजकारणाला प्रत्युत्तर देताना नवीन भाषा शोधणं या नागरी समाजाला शक्य होतं का, यावर २०१९ सालातील भारतीय लोकशाहीच्या सामर्थ्याची चाचणी होणार आहे.

●

## 'सन्मानजनक' अंतर राखावं

*जम्मू–काश्मीरच्या स्थानिक राजकारणात अतिक्रमण केल्यामुळे मुख्यप्रवाही राजकीय अवकाशाचा ऱ्हास होईल आणि फुटीरतावादी राजकारणाला अधिक चालना मिळेल.*

पीपल्स डेमॉक्रेटिक पार्टी– भारतीय जनता पक्ष (पीडीपी–भाजप) यांचं सरकार पडल्यानंतर पाच महिन्यांमध्ये जम्मू–काश्मीरच्या राज्यपालांनी विधानसभा बरखास्त करायचा निर्णय घेतला, हा काश्मीरच्या राजकारणातील आणखी एक महत्त्वाचा 'राजकीय क्षण' आहे. याचे राज्यातील विविध सामाजिक घटकांवर तात्कालिक परिणाम तर होतीलच, शिवाय आधीच डळमळीत झालेला लोकशाही अवकाश व केंद्र सरकारविषयीची लोकांची मतं यांवरही याचे पडसाद उमटतील.

पीडीपी नेत्या मेहबूबा मुफ्ती यांनी जम्मू–काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स (जेकेएनसी) व काँग्रेस या पक्षांच्या पाठिंब्यावर सरकारस्थापनेचा दावा केल्यानंतर लगेचच राज्यपालांनी हा निर्णय घेतल्यामुळे तो वादग्रस्त ठरला आहे. दरम्यान, जम्मू–काश्मीर पीपल्स कॉन्फरन्सचे (जेकेपीसी) नेते सज्जाद गनी लोन यांनी भाजपच्या पाठिंब्यावर सरकार स्थापण्यासाठी प्रतिदावा केला आहे.

यातील विरोधाभासाचा भाग असा की, पीडीपी–भाजप सरकार पडल्यापासून विधानसभा बरखास्त करण्याची जोरदार मागणी जेकेएनसी व पीडीपी यांच्याकडून केली जात होती, परंतु यासंबंधीचा निर्णय 'निलंबित चेतने'च्या (सस्पेन्डेड ॲनिमेशन) स्वरूपात ठेवण्यात आला होता. भाजपने जेकेपीसीच्या पाठिंब्यावर आणि पीडीपीसह जेकेएनसी व काँग्रेस या पक्षांमधील काही पक्षबदलू नेत्यांना सोबत घेऊन सरकार स्थापण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत, असे अंदाज वर्तवण्यात आल्यानंतर ही मागणी करण्यात आली. लोन यांनी तिसऱ्या आघाडीची संकल्पना मांडली, तेव्हा पीडीपीच्या काही मुख्य सदस्यांनीही या आघाडीत सहभागी व्हायची उघड इच्छा व्यक्त केली होती.

तिसरी आघाडी व भाजप यांचं सरकार सत्तेवर येण्याच्या शक्यता थोपवण्यासाठी व भाजपच्या डावपेचांवर मात करण्यासाठी जेकेएनसी, पीडीपी व काँग्रेस यांच्या महाआघाडीची संकल्पना मांडण्यात आली. त्यामुळे राज्यपालांचा निर्णय पक्षपातीपणाचा असल्याची टीका पीडीपी व जेकेएनसी यांनी केली असली, तरी विधानसभा बरखास्त होणं त्यांनाही समाधान देणारं आहे. आपल्यावरील अस्थिरतेची टांगती तलवार यशस्वीरित्या दूर करण्यात या पक्षांना यश आलं आहे. विशेषतः दोन दशकांपूर्वीच अस्तित्त्वात आलेल्या पीडीपीसाठी हा धोका अधिक होता, कारण फूट पडून पक्षाचा मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता होती. जेकेएनसीची अवस्था इतकी वाईट नसली, तरी फारशी बरीही नव्हती. पीडीपीच्या उदयानंतर जेकेएनसीचं राज्याच्या राजकारणातील प्रमुख स्थान घसरलं. २०१४च्या विधानसभा निवडणुकांमध्ये तर जेकेएनसीला काश्मीर खोऱ्यातील सर्वांत मोठ्या पक्षाचं स्थानही टिकवून ठेवता आलं नाही. आता जेकेपीसीच्या नेतृत्वाखाली तिसरी शक्ती उदयाला येण्याची शक्यता जेकेएनसीला आणखी परिघावर ढकलण्यास कारणीभूत ठरणार होती.

अल्पकालीन परिप्रेक्ष्यातून पाहिलं तर असं म्हणता येईल की, विधानसभा बरखास्तीमुळे पीडीपीसमोरील संकट टळलं आहे आणि आपला कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या पीडीपीच्या मदतीला उभं राहून जेकेएनसीलाही स्वतःची सुस्वभावी प्रतिमा घडवण्यात यश आलं, शिवाय भाजपला दूर ठेवून आपण 'काश्मिरी हिता'चं रक्षण केल्याचा दावा करणंही जेकेएनसीला शक्य झालं आहे. परंतु, दूरस्थ विचार करायचा तर, काश्मीरमधील लोकशाही राजकारणाला या सर्व घटनाक्रमामुळे मोठा तडा गेला आहे. गेल्या दीड

दशकामध्ये इथल्या राजकारणाला पुरेशी विश्वासार्हता व खोली प्राप्त झाली होती, हे इथे नमूद करायला हवं. फुटीरतावाद कायम राहिला असला तरी लोकशाही राजकारणावरील लोकांचा विश्वासही वाढला होता. १९८९मधील सशस्त्र बंडखोरी व फुटीरतावाद यांमुळे मुख्यप्रवाही राजकारण पूर्णतः कोसळून पडलं होतं, ही वस्तुस्थिती पाहता मुख्यप्रवाही राजकारणाचा नंतरचा प्रवास विशेषच म्हणावा लागेल. केंद्रातील सत्ताधारी काँग्रेस पक्षाची अवाजवी अतिक्रमणकर्ती भूमिका आणि राज्यातील सत्तेच्या राजकारणाचा गैरवापर करण्याची वृत्ती यांमुळे जम्मू-काश्मीर या अवस्थेपर्यंत येऊन ठेपलं. राज्यातील सत्तेच्या राजकारणावर नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या महत्त्वाकांक्षेपायी काँग्रेसनं १९८४ साली जेकेएनसीमध्ये फूट पाडली, फारूक अब्दुल्लांचं सरकार पाडलं आणि त्याजागी जी. एम. शाह यांच्या नेतृत्वाखाली पक्षबदलूंचं जनाधार नसलेलं सरकार स्थापन केलं. त्यानंतर सत्तेत आलेली जेकेएनसी-काँग्रेस यांची १९८६ सालातील जनाधार नसलेली आघाडी आणि १९८७ साली मोठ्या प्रमाणात गैरप्रकार घडल्याचं मानल्या जाणाऱ्या विधानसभा निवडणुकांमधील पाडाव, यांमुळे काश्मिरींचा लोकशाही राजकारणाविषयी भ्रमनिरास झाला. पुढे सत्तेवरील राजकारणावर काश्मिरी जनतेचा पुन्हा विश्वास बसावा, यासाठी अटलबिहारी वाजपेयी यांना बरेच प्रयत्न व राजकीय गुंतवणूक करावी लागली. राज्यात 'मुक्त व न्याय्य निवडणूक' होईल, असं आश्वासन २००२ साली वाजपेयींनी दिलं आणि राज्यातील सत्तेच्या राजकारणापासून केंद्र सरकारने सन्मानजनक अंतर ठेवलं. यामुळे स्थानिक तर्कचौकटीमध्ये निवडणुकीचं राजकारण रुजायला अवकाश मिळला, त्याचे दीर्घकालीन परिणाम झाले- लोकशाही प्रक्रियेला जोर मिळाला आणि तिचा अवकाश विस्तारत गेला.

या परिप्रेक्ष्यातून पाहिलं तर, सध्याचा घटनाक्रम काश्मीरमधील लोकशाहीच्या भवितव्याला सोयीचा नाही. स्थानिक पक्षांमध्ये फूट पाडून सरकार स्थापण्याचा भाजपचा प्रयत्न निवडणुकीय 'गैरप्रकारां'च्या संभाषिताला पुनरुज्जीवित करणारा ठरला आहे. काँग्रेसने १९८४-८७मध्ये ज्या प्रकारे राज्यातील राजकारणाचा गैरवापर केला तशाच प्रकारची भाजपची वाटचाल असल्याचा निष्कर्ष राजकीय विश्लेषकांनी काढला आहे. ही चांगली बातमी नाही, विशेषतः काश्मीरमध्ये सशस्त्र बंडखोरी व फुटीरतावादाची लाट पुन्हा आली असताना, अशा घडामोडी घातकच आहेत. राजकीय परिस्थिती इतकी अस्थिर असताना स्थानिक राजकारणात अतिक्रमण केल्यास मुख्यप्रवाही राजकीय अवकाश आणखी रोडावेल, शिवाय फुटीरतावादी राजकारणाला पुष्टी मिळेल. सद्यस्थितीत, लोकशाही राजकारणाला बळकटी आणण्याची गरज आहे आणि विशिष्ट पक्षाच्या राजकीय हितसंबंधांच्या सोयीसाठी राजकीय क्लृप्त्या खेळल्या जाऊ नयेत.

●

हे संपादकीय रेखा चौधरी यांनी लिहिलं आहे. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज्, राष्ट्रपती निवास, शिमला' इथे 'फेलो' असलेल्या रेखा चौधरी यांनी 'जम्मू ॲंड काश्मीर : पॉलिटिक्स ऑफ आयडेन्टिटी ॲंड सेपरेटिझम' (२०१६) हे पुस्तक लिहिलं आहे. (rekchowdhary@gmail.com)

**परिवर्तनाचा वाटसरूसाठी**
**लेखन पाठवताना**

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी
ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले
वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये
श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड
फाँटमध्ये पाठवावे.

# मरण स्वस्त होत आहे

*रोजगाराच्या आघाडीवरील महाकाय अपयशाविषयी सरकारला प्रश्न विचारणं, हे जगण्यातील नैतिक मूल्यासाठी गरजेचं आहे.*

राजस्थानातील अलवार जिल्ह्यामध्ये २० नोव्हेंबर रोजी तीन तरुणांनी ठरवून एकत्रितरित्या चालत्या ट्रेनसमोर उडी मारत आत्महत्या केली. भारतात गेल्या काही काळात होत असलेल्या शोकांतिक मृत्युमालिकेतील ही एक कडी होती. नैतिक सामान्य समजाच्या निकषांवर पाहिलं तर, 'दीर्घायुष्य किंवा उदात्त कार्यासाठी हौतात्म्य' अशा द्वैतानुसार भारतीय लोक मृत्यू या संकल्पनेचं मूल्यमापन करताना दिसतात. त्यातही दुसरा पर्याय नैतिकदृष्ट्या अधिक मूल्यवान मानला जातो. श्रमशक्तीची गुंतवणूक सर्जनशील कृतीच्या अवकाशात केल्यावरच व्यक्तीच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. व्यक्तीला तिच्या मानसिक व शारीरिक ताकदीचा वापर करायला मदत होईल अशा अनुकूल परिस्थितीची उपलब्धता या गुंतवणुकीमध्ये गृहीत धरलेली असते. स्वमूल्याची जाणीव विकसित व्हायला अशा प्रकारची अनुकूल परिस्थिती महत्त्वाची असते. प्रतिकूल परिस्थितीचा वेढा पडला असेल तर स्वमूल्य विरून जात असल्याची जाणीव पकड घेते. किंबहुना सकृत्दर्शनी आश्वासक वाटत असलेली रचनात्मक परिस्थिती शेवटी उद्वेगजनक असल्याचंही निदर्शनास येतं. विशेषतः महत्त्वाकांक्षी तरुणाईला अनेकदा या अनुभवाला सामोरं जावं लागतं. महत्त्वाकांक्षा प्रत्यक्षात उतरण्याला शिक्षणानेच मर्यादा येते, हा यातील विरोधाभास आहे. उच्चशिक्षणातील वाढती नावनोंदणी आणि त्यानंतर सुरक्षित भविष्याचा एकमेव मार्ग म्हणून स्पर्धा परीक्षांच्या व्यवस्थेवर दिला जाणारा भर, हे सगळे बिकट स्थिती सुरू असल्याचे संकेत आहेत.

स्पर्धा परीक्षा ही संकल्पना व्यावहारिक पातळीवर मर्यादेपर्यंत ताणली गेली आहे, त्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारसमोरचा पेचप्रसंग अधिक गंभीर बनला आहे.

राजस्थानात आत्महत्या केलेले तीन तरुणही नागरी सेवेत प्रवेश करण्याची महत्त्वाकांक्षा राखून होते, त्यामुळे ही घटनासुद्धा व्यापक बिकट स्थितीचाच भाग आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता आणि आपल्या वैध महत्त्वाकांक्षेला प्रत्यक्षात आणण्यासाठी ते करत असलेले प्रामाणिक प्रयत्न, यांचा विचार करता त्यांना एखादी स्थिर नोकरी- मुख्यत्वे सरकारी नोकरी मिळायला हवी होती. पण त्यांच्या स्वमूल्यांकनामध्ये ते बेरोजगार झाले होते आणि भविष्यात रोजगार मिळायची कोणतीही आशा नव्हती. त्यांच्या मित्रांनी सांगितल्यानुसार, आपण आपल्या पालकांवर आणि संपूर्ण समाजावर ओझ्यासारखे झालो आहोत, अशी भावना या तिघांच्यात निर्माण झाली होती. आपण काय व्हायला हवं होतं आणि प्रत्यक्षात काय झालो आहोत, या प्रश्नातील विसंगतीमधून स्वमूल्याचा ऱ्हास होतो आणि निरर्थकतेची भावना वरचढ ठरते. देशातील बहुसंख्य तरुणाई अशा विसंगतीमध्ये अडकलेली आहे, असं विवाद्यरित्या म्हणता येईल. गेल्या काही वर्षांमध्ये झालेले अनेक तरुणतरुणींचे शोकांतिक मृत्यू या सततच्या विरोधाभासाकडे निर्देश करतात.

परंतु, तरुणाईची राष्ट्रवादी मांडणी करणारे राजकारणी अनेकदा तरुणाईचं नैतिक मूल्य प्रतीकात्मकदृष्ट्या वाढवतात. या संभाषितामध्ये तरुणाई ही देशाची विकासात्मक संपत्ती, राष्ट्राचा अभिमान वा भारताचा भवितव्य असल्यासारखं बोललं जातं. राजकारणी आणि विद्यमान सरकारमधील बहुतांश नेते त्यांच्या दृष्टिकोणातील 'मेक इन इंडिया' अभियानामध्ये 'युवाशक्ती'चा मोठा सहभाग असल्याचा गाजावाजा करतात. परंतु, अशा वक्तृत्वरम्य मांडणीमध्ये मरणारी

तरुणाई निरुपयोगी ठरते. आपलं जीवन संपवणाऱ्या तरुणांच्या मृत्युमालिकेविषयी प्रामाणिकपणे थोडंसं दुःख व्यक्त करण्याचीही पर्वा नसलेल्या नेत्याचंच प्रतिबिंब उर्वरित शासकवर्गाच्या वृत्तीमध्ये पडलेलं आहे. बाजारपेठ व सरकार यांमुळे या वृत्तीचं परखड विश्लेषण होण्यासाठी आवश्यक परिस्थिती व संधीच उपलब्ध होत नाही. किमान चांगल्या रोजगाराच्या संधींच्या अभावी पहिल्यांदा सामाजिक मृत्यू ओढवतो आणि नंतर जैविक मृत्यू होतो.

भारतीय संदर्भात सामाजिक मृत्यू जातिआधारित नागरी समाजाच्या थंड प्रतिसादाद्वारे सामाजिक होतो. मॅनहोलमधील हानिकारक सांडपाणी आणि अशा मृत्यूच्या विवरांमध्ये प्रवेश करणं भाग पडणारी माणसं, यांच्यात भेद करू न शकणारा हा समाज आहे. किंबहुना, शारीरिक मृत्यू हा सामाजिक मृत्यूचीच निष्पत्ती आहे. अप्रतिष्ठेचा विदारक अनुभव आणि स्वमूल्याचा मानहानिकारक ऱ्हास यांतून होणाऱ्या सामाजिक मृत्यूपासून दूर जाण्यासाठी शेतकरी व बेरोजगार तरुण जैविक मृत्यूचा दुर्दैवी मार्ग स्वीकारतात. तरुणाईच्या अस्तित्त्वाचा पुरावा त्यांच्या सर्जनशील आयुष्यातून नव्हे, तर मृत्यूमधून मिळतो आहे. मृत्यूनंतर होणारा पोलीस तपास, न्यायवैद्यकीय तपासणी आणि नुकसानभरपाई यांतूनच तरुणाईच्या अस्तित्त्वाची दखल घेतली जाते आहे.

सांस्कृतिक राष्ट्रवादापासून ते धार्मिक रचना उभ्या करण्यापर्यंत अनेक प्रतीकात्मक मुद्द्यांचा नियमितपणे वापर करून या तरुणांना राज्यसंस्था फसवत असली, तरी तरुणसुद्धा या प्रकल्पात सहभागी होताना दिसतात, ही विरोधाभासाची परिस्थिती आहे. आपलं सरकार तरुणाईला रोजगार पुरवण्यामध्ये अकार्यक्षम ठरलं आहे, हे सत्य सांगण्याची नैतिक क्षमता सत्ताधारी पक्षांमध्ये व त्यांच्या नेत्यांमध्ये उरलेली नाही. कौशल्यविकास कार्यक्रम आणि रोजगारमेळे हे केवळ एक मृगजळ आहे, निष्फळ खटाटोप आहे, हे सत्य सांगणं या राजकारण्यांना जमत नाही. सरकारच्या या क्लृप्त्यांमुळे केवळ बऱ्याच नोकऱ्या उपलब्ध असल्याचा भ्रम निर्माण होतो आणि हे रोजगार मिळवण्यासाठी तरुणाईला केवळ कौशल्यांची गरज आहे अशी दिशाभूत केली जाते. अशा परिस्थितीत, बेरोजगारीची मूलभूत समस्या सोडवण्याची क्षमता सरकारमध्ये नाही, हे सत्ताधारी पक्षाला सांगण्याचा नैतिक निर्धार भारतीय तरुणांकडे आहे. परंतु, सत्तेसमोर सत्य बोलण्याचं माध्यम शोकांतिक असू नये. ते परिवर्तनकारी असायला हवं. तरुणांची धार्मिक आधारावर दिशाभूल करण्याचा कार्यक्रम राजकीय पक्षांकडे आहे, अशा वेळी किमान चांगल्या व सुरक्षित जीवनाविषयी प्रश्न विचारणं आणि पुढाकार घेणं, ही तरुणाईची जबाबदारी नाही का?

●

---

## महाराष्ट्रातील दुष्काळ

*दुष्काळाचा सामना करण्यात सरकार अकार्यक्षम ठरत असल्यामुळे ग्रामीण भागातील संकट गंभीर होत चाललं आहे.*

दुष्काळग्रस्त भागांमधील लोकांनी सातत्याने दबाव आणल्यानंतर अखेरीस ३१ ऑक्टोबरला महाराष्ट्र सरकारने २६ जिल्ह्यांमधील १५१ तालुक्यांना दुष्काळाचा फटका बसल्याचं जाहीर केलं. त्यापूर्वी दुष्काळाच्या व्याख्येवरून सरकारने बराच शब्दच्छलही केला. सरकारने केलेलं दुष्काळाचं मूल्यमापन अतिशय अपुऱ्या अंदाजावर आधारलेलं आहे, हे प्रत्यक्ष परिस्थितीच्या आढाव्यावरून दिसतं. केंद्र सरकारने २०१६ साली काढलेल्या दुष्काळविषयक हस्तपुस्तिकेतील कठोर व मनमानी नियमांच्या

पालनामुळे हे मुख्यत्वे झालेलं आहे.

महाराष्ट्रात सध्या अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती आहे. १९७२च्या तुलनेत या वर्षीचा दुष्काळ खूप जास्त गंभीर असल्याचं मानलं जातं आहे. राज्यात पहिल्यांदाच खरीप मोसमासोबतच रब्बी मोसमातही दुष्काळ आला आहे. १५ नोव्हेंबरपर्यंतच्या आकडेवारीनुसार, १३.०५ लाख हेक्टर जमिनीवर रब्बी पिकांची पेरणी झाली होती; २०१७मध्ये याच कालावधीमध्ये २८.३५ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आली होती. मातीमधील दमटपणाचा अभाव आणि उन्हाळ्यात पाणी प्यायला मिळावं यासाठी तलावांमध्ये पाणीसाठा टिकवण्याचा निर्णय, यांचा परिणाम या मोसमातील रब्बी पिकांवर होणार आहे. वार्षिक सरासरीपेक्षा तीस टक्के कमी पाऊस या वर्षी पडला, त्याने आधीच तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

विशेषतः नाशिक-उत्तर महाराष्ट्र व मराठवाडा प्रदेशांमध्ये पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे, कारण तिथल्या धरणांमध्ये अनुक्रमे सुमारे ६५ टक्के व २७ टक्के इतकाच पाणीसाठा टिकून आहे. नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच या प्रदेशातील ४९८ गावांना व ९५९ खेड्यांना ५७५ टँकरांद्वारे पाणीपुरवठा करावा लागत होता. महिन्याअखेरीला हा आकडा ८१६ टँकरांपर्यंत पोचला आहे आणि ६९८ गावांना व १,५११ खेड्यांना पाणीपुरवठा करावा लागतो आहे. गेल्या वर्षी ९३ टँकरांद्वारे १२२ गावांना पाणीपुरवठा करावा लागला होता. या परिस्थितीसाठी केवळ अपुऱ्या पावसाला दोषी धरता येणार नाही. धोरणलकव्यामुळे मानवनिर्मित अशी ही आपत्ती ओढवली आहे. परंतु, राज्य सरकारने केलेले अवाढव्य दावे आणि प्रत्यक्षातील भयानक परिस्थिती, यांच्यातील तफावतीमुळे ही आकडेवारी पुन्हा उद्धृत करावी लागते आहे. दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे 'जलयुक्त शिवार' योजनेविषयी परत एकदा काही मूलभूत प्रश्न उपस्थित झाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही योजना जलसंधारणाबाबत पथदर्शी ठरेल, असा गाजावाजा केला होता. या योजनेमुळे १६ हजार गावं दुष्काळमुक्त झाल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिर्डीत केला, त्यानंतर काहीच दिवसांमध्ये राज्य सरकारला जवळपास २० हजार गावांचा समावेश असलेले १५१ तालुके दुष्काळग्रस्त असल्याचं जाहीर करावं लागलं. दुष्काळी भागांमध्ये गणण्यात आलेल्यामधील किती गावं तथाकथित दुष्काळमुक्त गावांपैकी आहेत, हे राज्य सरकारने सोयीस्कररित्या उघड केलेलं नाही. या योजनेमुळे भूजल पातळी वाढल्याचा दावा सरकार व काही तज्ज्ञांनी केला असला, तरी भूजल सर्वेक्षण व विकास संस्थेने प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील ११,४८७ गावांमध्ये एका मीटरहून अधिक प्रमाणात भूजल पातळी घटली आहे, तर ५,५५६ गावांमध्ये एक ते दोन मीटरांनी भूजल कमी झालं आहे, २,९९० गावांमध्ये दोन-तीन मीटरांनी आणि २,९४१ गावांमध्ये तीनहून अधिक मीटरांनी भूजल पातळी कमी झाली आहे. याचं कारण केवळ अपुरा पाऊस एवढंच नाही. भूजल सर्वेक्षण व विकास संस्थेच्या आकडेवारीमध्ये नमूद केल्यानुसार, २०१४ व २०१५ या वर्षांमध्ये पाऊस आणखी कमी पडला, तरीही भूजल पातळीमध्ये एक मीटरहून जास्त घट झालेल्या गावांची संख्या बऱ्यापैकी कमी होती.

आठ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च झालेल्या जलयुक्त शिवार योजनेविषयी स्वाभाविकपणे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या योजनेचा एक तर काहीच परिणाम झालेला नाही किंवा झालाच असेल तर विपरित स्वरूपाचा आहे. या योजनेत मुख्यत्वे जेसीबी-कंत्राटदार लॉबीद्वारे नाला रुंदीकरण व खोलीकरणाची कामं केली जात आहेत; या कामांसाठी मोजाव्या लागणाऱ्या पर्यावरणीय, जलविद्युतीय व सामाजिक किंमतीबाबत काही तज्ज्ञांनी व कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या वर्षीच्या दुष्काळामुळे तरी सरकारने स्वतःची पाठ थोपटवणं थांबवून चिकित्सक मतांकडे लक्ष द्यायला हवं.

अभ्यासूपणाचा देखावा उभा करणं आणि चकचकीत योजनांना अभिनव असल्याप्रमाणे सादर करणं, ही महाराष्ट्र सरकारची वृत्ती जलयुक्त शिवार योजनेमध्ये ठळकपणे दिसून आली. चारा तुटवड्याचा प्रश्नही यामुळे गंभीर बनला आहे. गायीगुरांसाठी चारा छावण्या उभारण्याची मागणी जोर धरू लागली असताना, पशुसंवर्धन खात्याने चारा पिकवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावं याकरिता थेट रोख हस्तांतरणाचा प्रस्ताव ठेवला आहे. मुळात आत्यंतिक पाणीटंचाईमुळे कोणतंही पीक घेणं अशक्य बनलं असताना हा प्रस्ताव म्हणजे क्रूर विनोदच ठरला आहे. कुटुंबातील एका कर्त्या व्यक्तीला चारा छावणीत जनावरांना घेऊन राहावं लागू नये, यासाठी घरापर्यंत चारा पुरवण्याची मागणीही करण्यात आलेली आहे, हे नमूद करायला हवं.

आणखी एका कारणामुळे या वर्षीचा दुष्काळ १९७२ सालापेक्षा वेगळा ठरतो. १९७२ साली दुष्काळ निवारण आणि निर्मूलन मंडळाच्या नेतृत्वाखाली जोमाने लोकचळवळ उभारण्यात आली होती. विविध सार्वजनिक विचारक- अकादमिक अभ्यासक व कष्टकरी जनतेचे नेते या मंडळामध्ये एकत्र आले होते आणि दुष्काळ निवारण व निर्मूलनासाठी प्रयत्नशील झाले होते. एकात्मिक जलविभाजक विकासाचा प्रश्न आणि मानवनिर्मित दुष्काळाचं निर्मूलन, असे प्रश्न सार्वजनिक संभाषितामध्ये केंद्रस्थानी आणण्याचं श्रेय त्या चळवळीला जातं. आजच्या महाकाय संकट परिस्थितीमध्ये अशा प्रकारचा लोकप्रतिसाद अजून आलेला नाही. तसं घडलं तर सरकारला अर्थपूर्ण हस्तक्षेप करणं भाग पडू शकतं. दुष्काळ निवारण आणि निर्मूलन मंडळ पुनरुज्जीवित करायचे प्रयत्न अलीकडच्या काळात झाले. तत्काळ दिलासा मिळण्यासाठी दुष्काळ निवारणावर लक्ष केंद्रित करणं आज अत्यावश्यक बनलं आहे, पण त्याचसोबत दुष्काळ निर्मूलनाच्या दीर्घकालीन कार्याकडे दुर्लक्षही करता कामा नये. या उपक्रमाशी संबंधित कार्यकर्ते व बुद्धिजीवी सातत्याने हा मुद्दा मांडत आहेत. दिलासा व निवारण कामांशी संबंधित छुपे हितसंबंधी गट व अशा कामांच्या आधारेच मोठे झालेले लॉबी गट यांवर मात करण्यासाठी प्रस्तुत दृष्टिकोनाचा अधिक लोकप्रचार करणं आणि लोकांना त्यानुसार संघटित करणं शक्य आहे.

●

---

## मुंबईतील सक्तीचं 'पुनर्वसन'

*पुनर्वसित रहिवाश्यांनी 'जीवन बचाव आंदोलन' सुरू केलं आहे, पण राज्यसंस्थेसाठी हे लोक अस्तित्त्वात तरी आहेत का?*

मुंबईच्या तानसा तलाव पाइपलाइन भोवतीच्या ५,७०० कुटुंबांना माहूलमध्ये स्थलांतरित करण्याची संपूर्ण प्रक्रिया गरीबांच्या अस्तित्त्वाविषयी क्रूर व जाणीवपूर्वक बेपर्वाई दाखवणारी ठरली आहे. शिवाय या नागरिकांविषयीच्या आपल्या जबाबदारीकडे राज्यसंस्था कशा रीतीने पाहते, हेही यावरून दिसतं. सुमारे ३० हजार लोकांना त्यांच्या मूळ जागेवरून सक्तीने हटवून राजकीय स्वार्थाची दुर्गंधी येणाऱ्या 'वायू कोठ्यां'मध्ये व 'विषारी नरकां'मध्ये पाठवण्याची ही प्रक्रिया गेलं दशकभर सुरू आहे आणि त्यातील प्रत्येक टप्पा दडपशाहीने पूर्ण करण्यात आला आहे. दैनंदिन गरजासुद्धा पूर्ण करता येणार नाहीत आणि आधीच दयनीय अवस्थेत असलेलं जीवनमान आणखी खालावेल, अशा ठिकाणीही त्यांना स्थलांतरित करण्यात आलेलं आहे. या कुटुंबांनी ही दडपशाही मुकेपणाने सहन केलेली नाही, हीच त्यातल्यात्यात समाधानाची बाब आहे. आपली दुर्दशा लोकांच्या नजरेला यावी आणि अधिकारी संस्थांवर दबाव यावा, यासाठी ते

सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

महाराष्ट्रामध्ये विविध प्रकल्पांचा फटका बसलेल्या सुमारे ३० लाख लोकांचं पुनर्वसन अजून झालेलं नाही. तानसा तलाव पाइपलाइनपासून १० मीटरच्या क्षेत्रात राहणारे झोपडपट्टीवासीय आणि त्यांच्या झोपड्या हटाव्यात, कारण त्यातून सुरक्षेला धोका निर्माण होतो, असं मुंबई उच्च न्यायालयाने २००९ साली माहूल प्रकरणात राज्य सरकारला सांगितलं. एकूण १६,७१७ झोपडपट्ट्यांपैकी ७,६७४ झोपडपट्ट्या पुनर्वसनासाठी पात्र ठरवण्यात आल्या. या परिसरातील रहिवाशांनी निषेध केला, विनवणी केली, तेव्हा त्यांनी व्यक्त केलेल्या चिंतांचा विचार केला जाईल, असं आश्वासन राजकारण्यांनी (विद्यमान राज्य मंत्रिमंडळातील एका मंत्र्याचाही यात समावेश होता) दिलं. परंतु, घरं उद्ध्वस्त करून सक्तीने बाहेर काढण्यात आल्यामुळे माहूलला जाण्याव्यतिरिक्त दुसरा काही पर्यायच समोर नसल्याची अवस्था अनेक रहिवाश्यांसमोर उभी राहिली. प्रत्येकी सात मजल्यांच्या ७२ इमारतींच्या परिसरात त्यांचं स्थलांतर करण्यात आलं आहे. हे सर्व अतिवास्तववादी वाटावं अशा प्रकारचं दृश्य आहे. अशा प्रकारच्या मोठ्या निवासी वसाहतीसोबत सर्वसाधारणतः देण्यात येणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधा इथे उपलब्ध नाहीत. उलट, दोन मोठे तेल शुद्धीकरण प्रकल्प, एक ऊर्जानिर्मिती कंपनी, एक रासायनिक व खतांची कंपनी, इतर बड्या औद्योगिक आस्थापनांच्या मधोमध ही वसाहत आहे.

माध्यमांमधील बातम्यांनुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्वांगीण पर्यावरण प्रदूषण निर्देशांकानुसार, माहूल गंभीररित्या प्रदूषित आहे. राष्ट्रीय हरित लवादाने २०१५ साली माहूलला मानवी निवाऱ्यासाठी अपात्र ठरवलं होतं. इथल्या काही रहिवाशांच्या गटाने आणि त्यासोबतच तानसा पाइपलाइनचा फटका बसलेल्या काही रहिवाशांनी मुंबई उच्च न्यायलायात याचिका दाखल केली होती, त्यानंतर या रहिवाशांना दुसऱ्या राहाण्याच्या जागी हलवावे, असे आदेश ऑगस्ट २०१८मध्ये न्यायालयाने दिले. दुतोंडीपणाचं नमुनेदार उदाहरण पेश करत राज्याच्या घरबांधणी मंत्र्यांनी रहिवाशांना कुर्ल्यातील एका प्रकल्पामध्ये पुनर्वसित करण्यात येईल असं आश्वासन दिलं, तर हा खटला न्यायालयात असल्यामुळे आपण निर्णय घेऊ शकत नाही असं मुख्यमंत्री नोव्हेंबर २०१८मध्ये म्हणाले. या परिसरातील रहिवाशांना आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा जवळच्या अंतरावर उपलब्ध नाहीत आणि आहेत त्या परवडण्याजोग्या नाहीत. त्याहून वाईट म्हणजे त्यांना अनेक आजारांचा व रोगांचा सामना करावा लागतो आहे- त्वचेवर चट्टे उमटणं, श्वसनविकार, क्षयरोग व एकूणच शारीरिक सुदृढतेचा अभाव या रहिवाशांमध्ये निर्माण झाला आहे. या विविध आजारांना पर्यावरणीय घटक जबाबदार आहेत, असं एका मोठ्या सरकारी रुग्णालयाच्या सर्वेक्षणात म्हटलं होतं, याचा उल्लेख या रहिवाशांनी उच्च न्यायालयात केलेल्या याचिकेत आहे. दूषित पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थेची दुरावस्था यांमुळे ही परिस्थिती आणखी गंभीर बनते. या प्रदेशात आल्यानंतर लागण झालेल्या रोगांमुळे अनेक जण मृत्युमुखी पडल्याचं माहिती अधिकार कायद्याखाली मिळालेल्या तपशिलांवरून स्पष्ट होतं, अशाही बातम्या आल्या आहेत.

त्यामुळे माध्यमांशी व प्रशासकांशी बोलताना इथले रहिवासी वारंवार मृत्यूची प्रतिमा वापरतात, यात काही आश्चर्यकारक नाही. आपल्याला मरण्यासाठीच या वसाहतीत पाठवण्यात आलं आहे, जगण्यासाठी नव्हे, असं त्यांना वाटतं. त्यांच्या मोहिमेलाही 'जीवन बचाव आंदोलन' असं नाव देण्यात आलं आहे. राज्यसंस्थेसाठी हे लोक जणू काही अस्तित्त्वातच नाहीत, असं दिसतं.

मुंबईला 'जागतिक दर्जाचं शहर' बनवण्याच्या योजना व प्रस्ताव प्रत्येक वेळी सत्तेवर आलेल्या सरकारांनी अभिमानाने जाहीर केल्या. पण या प्रस्तावित व अनेकदा काल्पनिक स्वरूपाच्या परिवर्तनाच्या मार्गात अनेकदा

काही अपायकारक शक्ती निर्माण झाल्याचं दिसतं. राजकीयदृष्ट्या जागरूक आणि कष्टकरी वर्गाच्या योगदानाविषयी अभिमान बाळगणारं शहर अशी मुंबईची एकेकाळची ख्याती होती. या ख्यातीला कारणीभूत असलेले घटक स्थिर गतीने नष्ट होत चालल्याचं लपवण्यापुरताच पायाभूत प्रकल्पांचा भास निर्माण केला जातो. या शहरातील विख्यात सार्वजनिक वाहतूक जाणीवपूर्वक कमकुवत केली जाते आहे आणि श्रमिक रहिवाशांना विस्तारित उपनगरांमध्ये दूरदूरवर ढकललं जातं आहे. या परिवर्तनामध्ये तुम्हाला टिकाव धरता येत नसेल, तर वाटेतून बाजूला व्हा आणि शांतपणे मरून जा, असाच संदेश यातून मिळतो. दुर्दैवाने, या एककल्ली परिवर्तनाच्या विरोधात लढण्याची माहूलवासीयांसारखी वृत्ती इतरत्र दिसत नाही.

शहरी गरीब व कमी उत्पन्न गटांच्या निवाऱ्यासाठीची सरकारी धोरणं किती अपुरी आहेत, तेही माहूल पुनर्वसन प्रकरणामुळे समोर आलं आहे. शहराच्या घडणीमध्ये आणि त्याच्या अर्थव्यवस्थेच्या कामकाजामध्ये नागरिकांच्या एका मोठ्या घटकाचं योगदान पूर्णतः नाकारलं जातं. अशा पार्श्वभूमीवर माहूलवासीयांनी दाखवलेली जिद्द सलाम करण्याजोगी आहे. ●

---

## बारमाही प्रवाह निष्प्राण होण्याच्या दिशेने..

*गंगेच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती व नैतिक जबाबदारीची जाणीव गरजेची आहे.*

नदी वाहत असते. नदीचा प्रवाह नंतर 'वापरला' जातो. या वापराच्या तर्कशुद्ध समर्थनासाठी नदीप्रवाह 'वाया' जाण्यापासून थांबवण्याचे प्रयत्न होतात. परंतु, आता हा वापर इतका वाढला आहे की, नदी 'जिवंत' आहे की नाही हे ठरवणं आपल्याला अशक्य झालेलं आहे. किंबहुना जिवंत नदी सापडणंच मुश्किल झालेलं आहे, कारण तिचे प्रवाह बोगद्यांमधून वीजनिर्मितीसाठी वळवले जातात, किंवा त्यात केवळ घाण व विषारी कचरा भरून पडलेला असतो, किंवा जलवाहिनीप्रमाणे नदीप्रवाहसुद्धा जोडणीसाठी तोडला व फिरवला जाऊ शकतो असं गृहीत धरलं जातं. हे सगळं नदीची उपासना केल्याच्या नावाखाली घडवता येतं. 'विकासा'मुळे नदीचा प्रवाह खंडित होत असताना तिचं 'पुनरुज्जीवन' सुरू असल्याचा कांगावा करता येतो. मुळातच जीवनदायी उपकरणांवर विसंबून असलेली ही नदी जिवंत आहे की नाही हे ठरवणं अवघड झालेलं आहे. प्रवाहाच्या नैसर्गिकपणाविषयीच शंका यावी इतक्या प्रमाणात नदीचा गैरवापर होत असेल आणि तिच्या अंगभूत भूगर्भीय व पर्यावरणीय कार्यांमध्ये अडथळे आणले जात असतील, तर तिला जिवंत नदी म्हणता येणं अवघड आहे. प्रवाहाची पर्यावरणीय एकात्मता आणि स्व-पुनरुज्जीवनाची क्षमता नाकारून प्रवाहाला खंडित केलं जात असेल, तर त्या नदीला जिवंत म्हणता येणं अवघड आहे.

इतर नद्याही तितक्याच महत्त्वाच्या आणि तितक्याच धोक्यात आहेत, पण गंगेकडे सरकारने लक्ष पुरवल्याचा दावा केला जात असूनही या नदीची अवस्था अत्यंत बिकट आहे. 'गंगेच्या बोलावणी'मुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीमधून निवडणूक लढवली होती. परंतु, हिंदुत्वाप्रमाणे गंगात्व वापरून उथळ भावना चेतवण्याचं काम करण्यात आलं. गंगेच्या कल्याणाचा खरा प्रयत्न मात्र झालेला नाही. गंगेची बोलावणी वा आवाहन पंतप्रधानांना अजून ऐकू येत असेल, या विश्वासापायी उपोषणाला बसलेले साधू (आधीचे पर्यावरण अभियंता) जी. डी. अगरवाल यांना ११२ दिवसांच्या उपोषणानंतर मरण आलं, पण त्यांची

विनवणी कोणाच्याही कानावर पडली नाही. अगरवाल यांनी केलेली मागणी उत्तराखंडमधून सातत्याने होत आलेली आहे. गंगेचा प्रवाह बहुतांश ठिकाणी ओघळाच्या पातळीवर आला आहे, त्याला वाळू उपसा व औष्णिक ऊर्जा विकास कारणीभूत ठरले आहेत, त्यामुळे या प्रश्नावर गांभीर्याने उपाय करावा, अशी ही मागणी होती. गंगेच्या बारमाही प्रवाहाचा स्त्रोत हिमालय पर्वतामध्ये आहे आणि तोच कोरडा, पोकळ व ठिसूळ होत चालला आहे.

नदीचा प्रवाह अविरत व निर्मळ ठेवण्याचं आश्वासन २०,००० कोटी रुपयांच्या 'नमामि गंगे' योजनेद्वारे देण्यात आलं, परंतु प्रत्यक्षात नदीचा सर्व प्रवाह पात्रातून वळवला जातो आहे, अशा वेळी नदीप्रवाह अविरत व निर्मळ कसा राहील? नदीचं 'पूर्णत्व' पुनर्स्थापित करणं, हे 'नमामि गंगे' योजनेचं एक उद्दिष्ट होतं. अविरतता व निर्मळता यांची जाणीव असल्याप्रमाणे हे उद्दिष्ट मांडण्यात आलं होतं. परंतु, वास्तवामध्ये पर्यावरणीय प्रवाह (नदीला नदी असण्याची नक्कल तरी करता येईल इतका किमान प्रवाह) टिकवण्याची किमान अटही प्रकल्पमालकांकडून पाळली जात नाही आणि या अटीचं पालन करणं बंधनकारकही ठरवलं जात नाही, पण अटीची व्याप्ती मात्र बदलत राहते.

वास्तवातील तथ्यांवर तोडगा काढण्यासाठी ठोस पावलं उचलण्याऐवजी पंतप्रधान उलट्या दिशेने जात आहेत. ते एकतर केवळ प्रतीकात्मकतेचा वापर करून मूळ मुद्द्याचं थिल्लरीकरण करतात किंवा नदीचा प्रवाह आणखी अडचणीत येईल असा प्रचंड प्रकल्पांची घोषणा करतात. शेवटी कॉर्पोरेट क्षेत्राच्या हितसंबंधांबाबतची आपली वचनबद्धता पाळण्याला ते प्राधान्य देताना दिसतात. नदीप्रवाह मुक्त करणं, तिच्या प्रवाहाची चौकट टिकवणं, सांडपाणी निचऱ्यावर देखरेख ठेवणं, पाण्याचा अवाजवी उपसा थोपवणं, वनआच्छादनं वाचवणं व वाढवणं, आणि नद्यांमध्ये भर घालणाऱ्या जलस्त्रोतांना नवसंजीवनी देणं, असे कोणतेही उपाय योजण्याऐवजी नदीतीरावर विकास साधण्याला महत्त्व दिलं जातं. त्यामुळे नदीपात्रांमध्ये काँक्रिटची बांधकामं होतात, अतिक्रमण होतं, पूरमैदानांचा व्यावसायिक कामांसाठी वापर केला जातो, आणि नदी अजून जिवंत आहे असा भास निर्माण करण्यासाठी इतर स्त्रोतांकडून नदीपात्राकडे पाणी फिरवलं जातं.

वरच्या अंगाला गंगेचा प्रवाह मृतःप्राय झाला आहे. हल्दिया-वाराणसी या १,६०० किलोमीटरच्या पट्ट्यात ५,३६९ कोटी रुपयांचा जलमार्ग विकास प्रकल्प बांधला जातो आहे. यामध्ये जागतिक बँकेची मोठी गुंतवणूक आहे. वाराणसीतील 'पेप्सी-को'च्या प्रकल्पाचंही पंतप्रधान मोदींनी अलीकडेच स्वागत केलं. नदीची यातून कोणती हानी होईल, याकडे त्यांनी दुर्लक्ष केलं. गंगेच्या प्रवाहामध्ये १,५०० टनी जहाजांचा वाहतुकीची क्षमता नाही, त्यामुळे कृत्रिमरित्या खोली वाढवण्यासाठी नदीगुंफण घालून, प्रचंड प्रमाणात नदीतळ खणणं, वारंवार गाळ उपसून काढणं आणि धरणं असे उपाय या प्रकल्पात योजले जाणार आहेत. एकमेकांना पूरक असे हे व्यावसायिक हितसंबंध आहेत. उदाहरणार्थ, नदीतून काढण्यात आलेला गाळ बांधकाम क्षेत्रामध्ये वापरला जाणं अपेक्षित आहे. नदीतळ खणण्याची कंत्राटं अदानी समूहासह इतर बहुराष्ट्रीय कंपन्यांना देण्यात आली आहेत. गंभीर प्रदूषणाच्या धोक्यांकडे दुर्लक्ष करण्यात आलं आहे. जलजीवनाचं निवासस्थान आणि मच्छिमार व नावाड्यांची उपजीविका यांचा विध्वंस होणार आहे, पण त्याकडेही दुर्लक्ष केलं जातं आहे. वाराणसीमधील कासव अभयारण्य सूचीतून काढलं जाण्याचं घाटतं आहे. या नदीच्या प्रवाहातील विशिष्ट प्रकारच्या डॉल्फिनसारख्या संकटग्रस्त प्रजातींना समूळ नष्ट करणारी ही प्रक्रिया आहे.

नदीच्या सुराशी सूर मिळवत जगणाऱ्या प्राणी व जीवांना जगवण्याची नदीची क्षमता किती आहे, यावरून तिचं आरोग्य व जिवंतपणा तपासला जात नसून व्यावसायिक उद्देशांची पूर्ती किती होते एवढाच निकष

वापरला जातो आहे. जलमार्ग, ऊर्जा, मलनिचरा, आणि धार्मिक पर्यटन, एवढ्याच उद्देशांनी नदीकडे पाहिलं जातं. केवळ पिळवणूक करण्यासाठीचा एक घटक एवढंच नदीचं स्थान असेल, तोवर तिच्यावरील काँक्रिटचं बांधकाम व प्रदूषण निर्धोकपणे सुरूच राहणार आहे. अशा प्रकारे नियमभंग केल्यास त्यावर दखलपात्र गुन्हा ठरवणं किंवा सशस्त्र गंगा संरक्षण पथकांना आगामी 'राष्ट्रीय गंगा नदी (पुनरुज्जीवन, संरक्षण व व्यवस्थापन) विधेयका'मध्ये सामील करून घेतल्याने खुद्द सरकारकडून मोठ्या प्रमाणात होत असलेल्या गुन्ह्यांना पूर्णविराम मिळणार नाही.

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१ व ८ डिसेंबर २०१८ या अंकांतून)

●

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

सनलाईट मीडिया डिस्ट्रीब्युशन

६३८, नारायण पेठ, पॉप्युलर हाऊस बिल्डिंग, दुकान क्र.३,
अप्पा बळवंत चौकाजवळ,
पुणे ४११०३०
भ्र. ९८५०६६२९८८

परिवर्तनाचा वाटसरू

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक जळगावमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अथर्व पब्लिकेशन्स

तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी,
जळगाव-४२५००१
दू. ०२५७-२२३९६६६

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक पुणे शहरात मिळण्याचे ठिकाण**

माणगावकर एजन्सी

५३८ अ, शनिवार पेठ, किबे लक्ष्मी थिएटरसमोर,
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०
भ्र. ७०२००४४६५५

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक परभणीमध्ये मिळण्याचे ठिकाण**

पूजा ग्रंथ वितरण

द्वारा संभाजी वाघमारे, बी. रघुनाथ हॉल,
वसमत रोड, परभणी
भ्र. ९८६०९८५६५२

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक अकोल्यामध्ये मिळण्याचे ठिकाण**

हरिष बुक स्टॉल

न्यू बस स्टँड, अकोला
भ्र. ९८२२२३३२६४

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक लातूरमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर,
प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक नांदेडमध्ये मिळण्याचे ठिकाण**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉम्प्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४